# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

मा. कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 23/06/21
टिपणी क्रमांक व्हीसी 2234
जावक दिनांक 25/06/21

मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
दिनांक 21 JUN 2021
टिपणी क्रमांक : 1809
जावक दिनांक : 21/08/2021

### सभेचे इतिवृत्त

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता सिध्दता समितीची सभा शुक्रवार, दिनांक ११ जून, २०२१ रोजी, दुपारी ०३:३० वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालील मान्यवर उपस्थित होते.

१) मा. डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, (अध्यक्ष)
२) मा. डॉ. एन. एस. उमराणी, सदस्य
३) मा. डॉ. प्रफुल्ल पवार, सदस्य
४) मा. डॉ. परवीन सय्यद, सदस्य
५) मा. डॉ. संजय धांडे, सदस्य
६) मा. डॉ. वैशाली शिंदे, सदस्य
७) मा. डॉ. अविनाश कुंभार, सदस्य
८) मा. डॉ. संजीव सोनवणे, सदस्य
९) मा. डॉ. प्रभाकर देसाई, सदस्य
१०) मा. डॉ. सुरेश गोसावी, सदस्य
११) मा. डॉ. माधवी रेड्डी, सदस्य
१२) मा. डॉ. वर्षा वानखेडे, सदस्य
१३) मा. श्री. प्रसेनजित फडणवीस, सदस्य
१४) मा. डॉ. प्रदिप भार्गवा, सदस्य
१५) मा. डॉ. आनंद देशपांडे, सदस्य
१६) मा. डॉ. सुप्रिया पाटील, सदस्य

सभेच्या सुरवातीस संचालक, अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष डॉ. सुप्रिया पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले व मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेच्या कामकाजास सुरूवात केली.

मा. सीए. अतुल पाटणकर, मा. श्री. संजीव मेहता यांनी सभेपूर्वी सभेस उपस्थित राहू शकत नसल्याचे कळविल्याने त्यांची रजा मंजूर करण्यात आली.

डॉ. सुप्रिया पाटील यांनी मा. कुलगुरू यांना उपस्थितांना मार्गदर्शन करण्याची विनंती केली. मा. कुलगुरू यांनी उपस्थितांना **"QS World University Ranking 2022"** च्या रॅंकिंगमध्ये विद्यापीठाने ६५० ते ७०० या क्रमवारीतून ५९१ ते ६०० च्या क्रमवारीत घेतलेल्या आघाडीबाबत, तसेच यावर्षीच्या **"Times Higher Education Asia Ranking"** मध्ये विद्यापीठाने पहिल्या २०० शैक्षणिक संस्थेंच्या क्रमवारीत स्थान मिळवल्याबाबत अवगत करुन सर्व सदस्यांचे सहकार्याबद्दल अभिनंदन केले. याशिवाय विद्यापीठाने सुरू केलेल्या विविध नाविन्यपूर्ण व समाजाभिमुख उपक्रमांबाबतची माहिती सभेस दिली.

प्रस्ताव क्र. १. मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणेबाबत.

ठराव क्र. ०१/११०६२०२१

असा ठराव करण्यात येतो की, मागील सभेचे (दि. १४ ऑगस्ट, २०२० रोजीचे) इतिवृत्त वाचून कायम करण्यात येत आहे.

प्रस्ताव क्र.. २. मागील सभेत झालेल्या निर्णयांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल.

ठराव क्र. ०२/११०६२०२१

असा ठराव करण्यात येतो की, दि. १४ ऑगस्ट, २०२० रोजी झालेल्या सभेतील निर्णयांवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

प्रस्ताव क्र. ३. सन २०१९—२० च्या Annual Quality Assurance Report (AQAR) च्या अहवालास मान्यता देणेबाबत.

ठराव क्र. ०३/११०६२०२१

असा ठराव करण्यात येतो की, सन २०१९—२० च्या Annual Quality Assurance Report (AQAR) च्या अहवालास मान्यता देण्यात येत आहे. पुढे असाही ठराव करण्यात येतो की, सदर अहवाल मा. व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने राष्ट्रीय मुल्यांकन आणि मानांकन परिषद (NAAC) यांचेकडे पाठविण्यात यावा.

प्रस्ताव क्र. ४. अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षाच्या कामकाजाचा आढावा घेण्याबाबत.

मा. संचालक अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष डॉ. सुप्रिया पाटील यांनी अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षाच्या मागील सभेनंतरच्या ठळक घडामोडीबाबत उपस्थितांना अवगत केले. त्यामध्ये

१. सन २०१९—२० मध्ये ASPIRE Research Scheme साठी संशोधक अध्यापकांकडून ८१६ प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यापैकी ११३ संशोधन प्रकल्पांना छाननीअंती मान्यतापत्र देण्यात आले असून त्यामधील १०८ संशोधकांनी पहिला व ८७ संशोधकांनी पहिला व दुसरा Progress Report सादर केला आहे.

२. अन्वेषण २०२० स्पर्धेमध्ये विद्यापीठास राष्ट्रीय स्तरावर विजेतेपद प्राप्त झाले.

३. कोरोना महामारी मुळे अविष्कार २०२० स्पर्धा आयोजित होवू शकल्या नाही.

४. सन २०२०—२१ मध्ये ASPIRE Research Project Scheme अंर्तगत साठी संशोधक अध्यापकांकडून १०६४ प्रस्ताव प्राप्त झाले असून सदर प्रस्तावांच्या छाननीचे काम विद्याशाखानिहाय नियुक्त केलेल्या चार समन्वयकांकडून प्रगतिपथावर आहे.

५. दर तीन वर्षांनी करण्यात येणाऱ्या Academic and Administrative Audit (AAA) साठी Data Collection चे काम विभागात सुरु करणार आहोत.

प्रस्ताव क्र. ५. अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षास विद्यापीठाच्या विविध विभागाकडून वारंवार लागणाऱ्या माहितीच्या अनुषंगाने विद्यापीठाच्या IT Cell कडून Software करुन घेण्यास प्रशासकिय व वित्तीय मान्यता घेणे बाबत.

ठराव क्र. ०४/११०६२०२१

असा ठराव करण्यात येतो की, अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षास विद्यापीठाच्या विविध विभागाकडून वारंवार लागणाऱ्या माहितीच्या अनुषंगाने विद्यापीठाच्या SPPU EDUTECH FOUNDATION या विद्यापीठाच्या कंपनी कडून आवश्यक ते Software करुन घेण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्ताव क्र. ६. मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयावर चर्चा करणे.

डॉ. सुप्रिया पाटील, संचालक IQAC यांनी मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने मा. अधिसभेच्या दि. ०९ व १० जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या सभेत शिफारस केलेले दोन ठराव समितीच्या विचारार्थ सादर केले.

प्रस्ताव क्र. ६. (१) (ASPIRE) संशोधन प्रोत्साहन योजनेचा लाभ देण्याबाबत दि. ०९ – १० जानेवारी, २०२१ रोजीच्या मा. अधिसभेच्या सभेमध्ये प्राचार्य संजय खरात यांनी खालील ठराव मांडला (क्र. अप्र (१४)/०९०१२१)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांची वृत्ती संशोधन वृध्दींगत व्हावी यासाठी (ASPIRE) संशोधन प्रोत्साहन योजना लागू केली सदर योजने अंतर्गत बहुतांशी सक्षम व पात्र प्राध्यापकांनी या योजनेचा खऱ्या अर्थाने लाभ घ्यावा असा ठराव अधिसभेपुढे सादर करीत आहोत.

त्यावर मा. अधिसभेने खालील ठराव केला आहे.
मा. अधिसभा ठराव : सदर ठराव मान्य करण्यात यावा अशी शिफारस ही अधिसभा सक्षम प्राधिकरणास करीत आहे.

ठराव क्र. ०५/११०६२०२१

असा ठराव करण्यात येतो की, मा. अधिसभेने शिफारस केलेला सदरचा ठराव अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षांतर्गत असलेल्या विविध योजनांचे मूल्यांकन (Assesment) व देखरेख (Monitoring) करण्यासाठी मा. कुलगुरु यांनी नियुक्त केलेल्या मा. डॉ. एस. अनंतकृष्णन् यांच्या समितीकडे विचारार्थ सादर करण्यात यावा.

प्रस्ताव क्र. ६. (२) संशोधन प्रोत्साहन योजनेचा लाभ आरक्षण तत्वावर देण्याबाबत दि. ९– १० जानेवारी, २०२१ रोजीच्या मा. अधिसभेच्या सभेमध्ये श्री. शशिकांत तिकोटे यांनी खालील ठराव मांडला (अप्र (६०)/०९०१२१)

विद्यापीठामार्फत प्राध्यापकांना संशोधन करण्यासाठी अर्थिक मदत केली जाते. या मदतीचे विभाजन आरक्षण तत्वावर केले जावे. जे विद्यापीठ अनुदान आयोग व आई. सी. एस. आर. करते तेच मार्गदर्शक तत्व विद्यापीठाने अवलंबवावे असा ठराव अधिसभेमध्ये मंजूर करण्यात यावा.

मा. अधिसभा ठराव : सदर ठराव मान्य करण्यत यावा अशी शिफारस ही अधिसभा सक्षम प्राधिकरणास करीत आहे.

ठराव क्र. ०६/११०६२०२१

असा ठराव करण्यात येतो की, उच्च प्रतीचे संशोधन प्रकल्प सादर व्हावेत यासाठी विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त संशोधन संस्था व UGC - HRDC, Pune यांच्या माध्यमातुन आरक्षित प्रवर्गातील शिक्षक संशोधकांना विशेषतः महिला व दिव्यांग यांना विशेष प्रशिक्षण देण्यात यावे.

प्रस्ताव क्र. ७. डॉ. संजीव सोनवणे, मा. अधिष्ठाता, आंतरविद्याशाखीय विद्याशाखा यांची महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोगाच्या सदस्य पदी निवड झाल्याबद्द्ल मा. श्री. प्रसेनजित फडणवीस, सदस्य, व्यवस्थापन परिषद, यांनी मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने अभिनंदनाचा ठराव मांडला.

ठराव क्र. ०७/११०६२०२१

असा ठराव करण्यात येतो की, डॉ. संजीव सोनवणे, मा. अधिष्ठाता, आंतरविद्याशाखीय विद्याशाखा यांची महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोगाच्या सदस्य पदी निवड झाल्याबद्द्ल अंतर्गत गुणवत्ता सिध्दता समिती अभिनंदन करीत आहे.

सुचक : मा. श्री. प्रसेनजित फडणवीस
अनुमोदक : डॉ. संजय धांडे व डॉ. प्रदिप भार्गवा

सभेमध्ये वरीलप्रमाणे कामकाज होऊन मा. संचालक अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष डॉ. सुप्रिया पाटील यांनी मा. अध्यक्षांच्या परवानगीने सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

18/06/21

(डॉ. सुप्रिया पाटील)
संचालक, अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष

(डॉ. एन. एस. उमराणी)
प्र-कुलगुरू

for 24/6

(डॉ. नितीन करमळकर)
कुलगुरू
अध्यक्ष